**-:प्रेसनोट:-**

## भुमी अभिलेख कार्यालय येथील भुकर मापक श्री रंजीत रामचंद्र कनोजकर व एका खाजगी इसमाविरुध्द अॅन्टी करप्शन ब्युरो चंद्रपूरची कारवाई

भुमी अभिलेख कार्यालय नागभिड जि. चंद्रपुर येथील परिरक्षण भुकर मापक श्री. रंजित रामचंद्र कनोजकर यांनी एका खाजगी इसमामार्फत तक्रारदाराचे आजोबाचे नावाने असलेल्या घराचे जागेची वडीलांचे नावाने फेरफार करण्याचे कामा करीता लाच रक्कम मागणी करून स्विकारल्याने अॅन्टी करप्शन ब्युरो चंद्रपूर यांचे पथकाने आज दि. ०५/०६/२०२६ रोजी कार्यवाही केली.

यातील तक्रारदार हे त्यांचे परिवारासह राहत असलेल्या घराची जागा ही त्यांचे आजोबाचे नावाने असुन आजोबा मरण पावले असल्याने त्या जागेवर वडीलांचे नावाने फेरफार करण्याकरीता उपअधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय नागभिड येथे जावुन तेथील परिरक्षण भुकर मापक श्री. रंजित रामचंद्र कनोजकर यांना भेटून अर्ज दिला होता. त्यावेळी श्री रंजित कनोजकर यांनी तक्रारदार यांना त्यांचे वडीलाचे नावाने फेरफार घेण्याकरीता १५ हजार रुपये लाच रक्कमेची मागणी केली होती. परंतु तक्रारदार यांना आरोपी श्री. रंजित कनोजकर, परिरक्षण भुकर मापक, कार्यालय उपअधीक्षक भुमी अभिलेख, नागभिड यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी दि. ०४/०६/२०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय चंद्रपुर येथे प्रत्यक्ष हजर येवुन तक्रार दिली.

तक्रारदार यांचे प्राप्त तक्रारीवरुन दि. ०४/०६/२०२६ रोजी आरोपी श्री. रंजित कनोजकर, परिरक्षण भुकर मापक, कार्यालय उपअधीक्षक भुमी अभिलेख, नागभिड यांची पंचासमक्ष पडताळणी केली असता त्यांनी तक्रारदार यांना त्यांचे आजोबाचे नावाने असलेल्या घराच्या जागेवर वडीलांचे नावाने फेरफार करण्याचे कामाकरीता तडजोडीअंती १० हजार रुपये लाच रक्कमेची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शविली.

त्यावरुन आज दि. ०५/०६/२०२६ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांनी आरोपी श्री. रंजित कनोजकर, परिरक्षण भुकर मापक, कार्यालय उपअधीक्षक भुमी अभिलेख, नागभिड यांना फोन केला असता त्यांनी खाजगी इसम जयंत दिपक कामडी, रा. तळोधी यांचेकडे लाच रक्कम देण्यास सांगीतले. त्यावरुन तक्रारदार यांनी आरोपी जयंत कामडी यांचेकडे १० हजार रुपये दिले असता त्यांनी ती लाच रक्कम स्विकारल्याने त्यास रंगेहात पकडून ताब्यात घेतले. तसेच आरोपी श्री. रंजित रामचंद्र कनोजकर, परिरक्षण भुकर मापक, कार्यालय उपअधीक्षक भुमी अभिलेख, नागभिड यांना सुध्दा ताब्यात घेण्यात आले आहे. पुढील तपासकार्य सुरु आहे.

सदरची कार्यवाही डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, श्रीमती माधुरी बावीस्कर, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर यांचे मार्गदर्शनात श्री अनिल जिट्टावार, पोलीस उपअधीक्षक, पोलीस निरीक्षक सचिन धर्मेजवार व सापळा पथक पोहवा रविकुमार इंगळे, पोशि अमोल सिडाम, राकेश जांभुळकर, प्रदिप ताडाम, सचिन गजभिये, म.पो.शि. मेघा मोहुर्ले, चापोशि/सतिश सिडाम सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर व चापोशि/संदिप कौरासे, मो.प.वि. चंद्रपूर यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.

सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, त्यांच्याकडे कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजेंट) यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ आमचेशी संपर्क साधावा.

## लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर

श्री अनिल जिट्टावार, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर :- ९८२३२७०५८१

श्री. सचिन धर्मेजवार, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर :- ९६२३०५५६५५

**Toll Free No. 1064** **Phone No. : 07172-250251** **Mob. No. 8379951064**

**Email: acbchandrapur@gmail.com** **Website: www.acbmaharashtra.gov.in**

( अनिल जिट्टावार )
पोलीस उपअधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर